# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ **Email : ropune.dte@gmail.com**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/प्रवेश/२०१४/२४३१ दिनांक : ०९/०६/२०१४

10 JUN 2014

प्रति

**प्राचार्य / संचालक**

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व संस्था

विषय : मुंबई हायकोर्टाच्या निकालानुसार तंखाखु नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ च्या अंमलबजावणीबाबत.
उच्च शिक्षण देणा-या संस्थामध्ये राष्ट्रगीत सक्तीचे करण्याबाबत

संदर्भ – १) मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे पत्र क्र १६/आस्था/सर्किर्ण/२०१४/१२१ दिनांक ०३/०६/२०१४ सोबत प्राप्त खालील शासन पत्र.

२) कार्यसन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र सकिर्ण-२०१३/प्र क्र ०३/१४/तांशि-७ दिनांक १५/०५/२०१४.

३) कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र सकिर्ण-११११/प्र क्र ६६/१४/समन्वय दिनांक १७/०४/२०१४.

४) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र संआसे/एनटीसीपी/नस्ती क्र १५७/तंबाखू नि/३७०९-११/२०१४ दिनांक १९/०३/२०१४

उपरोक्त संदर्भिय पत्र व त्या सोबतच्या सहपत्राची छायाप्रत सोबत जोडलेली आहे. सदर पत्राचे अवलोकन करावे. आपणास कळविण्यात येते की मा संचालक यांचेकडून संदर्भ पत्र क्र १ व्दारे प्राप्त निर्देशानुसार आपण कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास **तात्काळ** सादर करावा.

प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत- १) मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांना माहितीसाठी सादर
२) प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH Website : www.dtemaharashtra.gov.in


**ईमेलद्वारे**

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१४/990
दिनांक : 3 जून JUN 2014

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
**मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.**
सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
**मुंबई.**

विषय :- १) मुंबई हायकोर्टाच्या निकालानुसार तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ च्या अंमलबजावणीबाबत.
२) उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये राष्ट्रगीत सक्तीचे करण्याबाबत.

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक : संकीर्ण-२०१३/प्र.क्र.०३/ १४/ तांशि-७, दिनांक १५.०५.२०१४ चे पत्र व सहपत्र पहावे. प्रत सोबत जोडली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या पी.आय.एल. क्रमांक : ९८/२०१३ मध्ये दिनांक २५.०२.२०१४ रोजी देण्यांत आलेल्या निकालामध्ये तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ ची अंमलबजावणी राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये करण्याबाबत राज्य शासनास आदेशित करण्यांत आले आहे. त्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्याच्या हिताकरीता आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानुसार कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यांत याव्यात.

तसेच इयत्ता ११ वी व १२ वी सह उच्च शिक्षण घेण्यारे विद्यार्थी हे राष्ट्रगीत दररोज म्हणत नसल्यामुळे उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये राष्ट्रगीत सक्तीचे करावे, अशी मागणी छावा संघटनेच्या अध्यक्षांनी मा. विनोद तावडे, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्याकडे केलेली आहे व सदर मागणीच्या अनुषंगाने आवश्यक ती कारवाई करण्याबाबत मा. विनोद तावडे यांनी शासनास केलेली आहे. त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते कीं, आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये राष्ट्रगीत सक्तीचे करण्याबाबत आवश्यक त्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यांत याव्यात. प्रस्तुत प्रकरणी करण्यांत आलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करण्यांत यावा.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :
१. श्री. सु.पं. शास्त्री, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
२. श्रीमती का.रा. पिळणकर, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
३. कार्यासन क्रमांक-२ व १०, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.


शिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
- 4 JUN 2014
आवक क्र. 5630

महाराष्ट्र शासन

कृपया तात्काळ

क्र. संकिर्ण-२०१३/प्र.क्र.०३/१४/तांशि-७
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक :- १५ मे, २०१४.

प्रति,
संचालक, (तंत्रशिक्षण)
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय** :- १) मुंबई हायकोर्टाच्या निकालानुसार तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ च्या अंमलबजावणीबाबत.
२) उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये राष्ट्रगीत सक्तीचे करण्याबाबत.

संदर्भ :- १) कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. संकीर्ण-११११/(प्र.क्र. ६६/१४)/समन्वय, दि. १७/०४/२०१४.
२) कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र. संकीर्ण-११११/(सं.क्र. ३९५/१४)/समन्वय, दि. १७/०४/२०१४.

महोदय,

उपरोक्त विषयांवरील संदर्भाधीन पत्रांच्या छायाप्रती सहपत्रांसह सोबत जोडल्या आहेत. सदर पत्रांत नमुद केलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल / कार्यवाहीची माहिती समन्वय कार्यासनास <u>तात्काळ</u> उपलब्ध करुन देण्यात यावी व त्याची एक प्रत या कार्यासनास देखील सादर करण्यात यावी, अशी विनंती आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

आपला,

(सुधीर पं. शास्त्री)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

पत्र प्राप्त झाले
19 MAY 15
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

F:/2014/Astha-Samanvay/Letter/Wage

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-११११/(प्र.क्र.६६/१४)/समन्वय
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
दिनांक-: १७/०४/२०१४.

तात्काळ

प्रति,

सहसचिव/उपसचिव (महाविद्यालयीन शिक्षण/ व्यवसाय शिक्षण/ तंत्रशिक्षण/ विद्यापीठ शिक्षण /कला), उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

विषय :- मुंबई हायकोर्टाच्या निकालानुसार तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ च्या अंमलबजावणीबाबत

महोदय,

उपरोक्त विषयावरील सहसंचालक (असंसर्गजन्यरोग), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्या पत्र क्र. संआसे/NTCP/नस्ती क्र. १५७/तंबाखू नि./३७०९-११/२०१४, दि. १९/०३/२०१४ ची प्रत सहपत्रासह सोबत जोडली आहे.

२. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालामध्ये(PLI No. 98/2013, order dt. 25/02/2014) तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ ची अंमलबजावणी राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये करण्याबाबत राज्य शासनास आदेशित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्याच्या हिताकरिता उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानुसार कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देण्याची विनंती वरील पत्रान्वये करण्यात आली आहे. तरी या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपली विश्वासू,

(का.रा. पिळणकर)
कक्ष अधिकारी

सहपत्र:- वरीलप्रमाणे

D:\२०१३\General Letter- Samanvay.docx

# आरोग्य सेवा संचालनालय
(महाराष्ट्र राज्य)
## राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम
आरोग्य भवन, ७ वा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई - ०१

| | |
|---|---|
| संचालनालय- २२६२१०३१-३६<br>संचालक - २२६२०२९२<br>आयुक्त (कु.कं.) - २२६४००६३/६५<br>Website : http://maha-arogya.gov.in<br>Fax No. 022-22620234 (DHS) | सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) २२६२२०२७<br>सहा.संचालक (असंसर्गजन्य रोग) - २२६२१०४७<br>असंसर्गजन्यरोग कक्ष - २२६२३२२२<br>Emai:stcc.maharashtra@gmail.com<br>Fax No : 022-22642955 (NHM) |


जा.क्र.संआसे/NTCP/नस्ती क्र.१५७/तंबाखू नि./ 3709-11 /२०१४
दिनांक : १९/०३/२०१४

26 MAR 2014

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन ... समन्वय ... ३९६१९८
दिनांक ........ ११/३/१४
मध्यवर्ती क्रमांक २८/३/२०१४
463819

प्रति,
मा.प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई

विषय : मुंबई हायकोर्टाच्या निकालानुसार तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ च्या अंमलबजावणीबाबत...

संदर्भ:- मुंबई हायकोर्ट निकाल दि.२५/०२/२०१४.

मा.महोदय,

उपरोक्त संदर्भित मुंबई हायकोर्टाच्या निकालात तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ६ ची अंमलबजावणी राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये करण्याबाबत राज्यशासनांस सुचना करण्यात आल्या आहेत. सदर कायदयाच्या कलम ६ नुसार सर्व शैक्षणिक संस्थांपासूनच्या १०० मीटर परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विकण्यांस बंदी आहे. तसेच कलम ६ च्या नियम ३ नुसार सर्व शैक्षणिक संस्थांच्या प्रमुखाने याबाबत शैक्षणिक संस्थाच्या प्रवेशद्वारावर फलक लावणे बंधनकारक असून, ज्यामध्ये नमुद केले असेल की, या शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विकण्यांस बंदी असून, यांचे उल्लंघन करणांऱ्यावर कायदयानुसार रु.२००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल. आपल्या माहितीस्तव सदर कायदयाच्या कलम ६ ची माहिती व याबाबतचा मुंबई हायकोर्टाचा निकाल या पत्रासोबत जोडण्यात आला आहे.

उपरोक्त संदर्भित मुंबई हायकोर्टाच्या निकालात सदर कलमाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्ष म्हणजेच वर्ष २०१४-१५ सुरु होणे अगोदर करण्याबाबत नमुद करण्यात आले आहे.

१३८
२८/३

तरी सार्वजनिक आरोग्याच्या हिताकरिता आपल्या विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थांना सदर कायदयाच्या अंमलबजावणी मुंबई हायकोर्टच्या निकालानुसार करण्याबाबत सुचना करण्यात याव्यात, हि विनंती.

सोबतः- वरीलप्रमाणे

सहसंचालक (असंसर्गजन्यरोग)
आरोग्य सेवा मुंबई.

प्रत माहितीस्तव,
मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.आयुक्त (कु.क.) तथा अभियान संचालक, रा.ग्रा.आ.अ.,मुंबई.

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION

PUBLIC INTEREST LITIGATION NO.98 OF 2013

...

Dinar Yashwant Sohoni ...Petitioner
v/s.
The State of Maharashtra & ors. ...Respondents

...

Mr.Dinar Y. Sohono, petitioner-in-person.

...

CORAM: MOHIT S. SHAH, C.J. &
M.S.SANKLECHA, J.
DATE : 25 FEBRUARY 2014

P.C.:

In this public interest litigation the petitioner is seeking implementation of provisions of Rule 3 of the Cigarettes and Other Tobacco Products (Display of Board by Educational Institutions) Rules, 2009 ( the Rules), which reads as under:-

*3. Display of Board by Educational Institutions.*_

*(1) The owner or manager of any person in-charge of affairs of the educational institution shall display and exhibit a board at a conspicuous place outside the premises, prominently stating that sale of cigarettes and other tobacco products in an area within a radius of one hundred yards of the educational institution is strictly prohibited and that it is an offence punishable under Section 24 of the Act with fine which may extend to two hundred rupees.*



::: Downloaded on - 26/02/2014 20:01:20 :::

Bombay High Court

*(2) The distance of one hundred yards referred to in sub-rule (1), shall be measured radially starting from the outer limit of the boundry wall or fence, as the case may be, of the educational institution.*

2. Section 6 of the Cigarettes and Other Tobacco Products (Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution) Act, 2003 (the Act) provides that no person shall sell, offer for sale or permit sale of cigarette of any other tobacco product-

*(a) to any person who is under eighteen years of age, and*
*(b) in an area within a radius of one hundred yards of any educational institution.*

Section 24 of the Act further provides that any person who contravenes the provisions of section 6 shall be guilty of an offence under this Act and shall be punishable with fine which may extend to two hundred rupees.

Section 31(1) of the Act confers powers on the Central Government to make rules to carry out the provisions of the Act.

3. Accordingly, in exercise of the aforesaid powers the aforesaid Rules of 2009 have been made by the Central Government. Rule 3 of the Rules requires the owner or manager or any person in-charge of affairs of the educational institution to display and exhibit a board at a conspicuous place outside the premises stating that sale of cigarettes and other tobacco products in an area within a radius of one



::: Downloaded on - 26/02/2014 20:01:20 :::

Bombay High Court

hundred yards from the outer limit of the boundry wall/fence of the educational institution is strictly prohibited and that is an offence punishable under Section 24 of the Act, with fine which may extend to two hundred rupees.

4. Perusal of the relevant provisions of the Act and the above Rules, 2009 makes it clear that the duty cast upon the owner/manager/person in-charge of affairs of the educational institution is mandatory and merely because no consequences are provided for non-compliance with the said Rule 3 does not mean that Rule 3 is of no consequence.

5. Education Department of the State Government shall accordingly issue instructions to all the educational institutions in the State to implement Rule 3 of the Cigarettes and Other Tobacco Products (Display of Board by Educational Institutions) Rules, 2009. Such instructions shall be issued well in time, so that boards are displayed by all educational institutions as per the provisions of Rule 3 of the Rules before commencement of next academic year i.e. academic year 2014-15.

CHIEF JUSTICE.

(M.S.SANKLECHA, J.)



Bombay High Court
::: Downloaded on - 26/02/2014 20:01:20 :::

# Rules relating to prohibition on sale of cigarettes and other tobacco products, within 100 yards of educational institutions (Section 6 b)

MINISTRY OF HEALTH AND FAMILY WELFARE

G.S.R. 40(E) Dated 19th January, 2010.-In exercise of the powers conferred by Section 31 of the Cigarettes and Other Tobacco Products (Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution) Act, 2003 (No. 34 of 2003),and in supersession of the prohibition on sale of the Cigarettes and Other Tobacco Products around Educational Institutions Rules 2004, except as respects things, done or omitted to be done before such supersession, the Central Government hereby makes the following rules, namely:-

1. Short Title, Extent and commencement.-
   (1) These rules may be called the Cigarettes and Other Tobacco Products (Display of board by Educational Institutions Rules) 2009.
   (2) They shall extend to the whole of India.
   (3) They shall come into force on the date of their publication in the official gazette.

2. Definitions.- (1) In these rules, unless the context otherwise requires,-

   (a) "Act" means the Cigarettes and Other Tobacco Products (Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution) Act, 2003;
   (b) "Educational Institution" means any place or centre where educational instructions are imparted according to the specific norms and include any school/colleges and institution of higher learning established or recognized by an appropriate authority;
   (2) Words and expressions used and not defined in these rules but defined in the Act, shall have the meanings, respectively, assigned to them in the Act.

3. Display of Board by Educational Institutions.-

   (1) Display of Board - The owner or manager or any person in-charge of affairs of the educational institution shall display and exhibit a board at a conspicuous place(s) outside the premises, prominently stating that sale of cigarettes and other tobacco products in an area within a radius of one hundred yards of the educational institution is strictly prohibited and that it is an offence punishable under Section 24 of the Act with fine which may extend to two hundred rupees.

(2) Measurement of Distance.- The Distance on one hundred yards to in sub- rule (1), measured radially starting from the outer limit of boundary wall, fence or as the case may be, of the educational institution.

<u>Boards used by Govt of Delhi</u>



3'x2'



१५५९
१९/०५

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-१११९/(सं.क्र.३९५/१४)/समन्वय
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
दिनांक-: १७/०४/२०१४.

प्रति,

सहसचिव/उपसचिव (महाविद्यालयीन शिक्षण/ व्यवसाय शिक्षण/ तंत्रशिक्षण/ विद्यापीठ शिक्षण /कला), उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

विषय :- उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये राष्ट्रगीत सक्तीचे करण्याबाबत

महोदय,

उपरोक्त विषयावरील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे पत्र क्र. संकीर्ण २०१४/(६२/१४)-एस.डी. ४, दि. २६/०३/२०१४ ची प्रत सहपत्रासह सोबत जोडली आहे.

२. श्री. विनोद तावडे, विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद यांचे निवेदनाचे अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करुन, त्याबाबत त्यांना परस्पर कळविण्यात यावे, ही विनंती.

आपली विश्वासू,

(का.रा. पिळणकर)
कक्ष अधिकारी

सहपत्र:- वरीलप्रमाणे

TE-1/7

D:\२०१३\General Letter- Samanvay.docx

<u>महाराष्ट्र शासन</u>

<u>तात्काळ</u>

**E-mail:dosed.sd4@gmail.com**

क्र.संकीर्ण-२०१४/(६२/१४)-एस.डी.४,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २६/०३/२०१४.

प्रति,

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),
शिक्षण संचालनालय,
पुणे.

01 APR 2014

46750

<u>विषय :- उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये राष्ट्रगीत सक्तीचे करण्याबाबत</u>

उपरोक्त विषयी श्री.विनोद तावडे, विरोधी पक्षनेता यांचे दिनांक ११/०२/२०१४ चे पत्र त्या सोबतच्या सहपत्रांसह सोबत पाठविण्यात येत आहे.

२. प्रस्तुत पत्रात नमूद केलेल्या मुद्याबाबत शासनाचे प्रचलित धोरण व नियमानुसार योग्य ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा, ही विनंती.

सहपत्र — वरीलप्रमाणे.

(रमेश नि. गांगुर्डे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत: सहपत्रासह माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,
मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत:

कक्ष अधिकारी (उच्च व तंत्रशिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई-३२.
त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्याशी संबंधित मुद्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व त्याप्रमाणे अर्जदारास परस्पर कळविण्यात यावे, ही विनंती.

विनोद तावडे

विरोधी पक्ष नेता

महाराष्ट्र विधानपरिषद

क्र. मंत्री/शालेय शिक्षण/आवपी/ ४९९६

श्री.संदिप पटाडे अध्यक्ष मुंबई प्रदेश बुलंद छावा मराठा युवा परिषद, महाराष्ट्र यांचे स्वयंस्पष्ट निवेदन पुढील योग्य त्या कारवाईकरिता यासोबत आपणांकडे पाठवित आहे.

विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची व देशभक्तीची भावना रुजविण्यासाठी सर्व अनुदानित तसेच खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये जन-गन-मन हे राष्ट्रगीत गायले जाते. हे राष्ट्रगीत फक्त पहिली ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी गातात परंतु ११ वी व १२ वी सह उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी हे राष्ट्रगीत दररोज म्हणत नसल्यामुळे उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये राष्ट्रगीत सक्तीचे करावे अशी मागणी छावा संघटनेच्या अध्यक्षांनी सोबतच्या निवेदनाद्वारे केली आहे.

तरी या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्यात यावी, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

( विनोद तावडे )

विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद

मा.श्री.राजेंद्र दर्डा,

मा.मंत्री, शालेय शिक्षण,

महाराष्ट्र राज्य,

मंत्रालय, मुंबई.

१३२, पहिला मजला, विधान भवन, मुंबई -४०० ०३२

दूरध्वनी/फॅक्स:२२०२८८१६/३५५३. E-mail:vinodtawde@rediffmail.com . www.vinodtawde.co.in

प्रणीत
नोंदणी क्र. महा. ८१९/०२/औ.बाद/एफ-९५६३/औ.बाद
बुलंद
छावा
Buland CHHAWA
(अध्यक्ष महाराष्ट्र = ९०२९४१७६७८)
मार्कंडेय ... प्रदेश अध्यक्ष.
... प्रदेश कार्याध्यक्ष
कार्यालय : ओ/२७, श्री महापुरुष सुर्यकुंड हौ. सौ., महापुरुष मंदिर मार्ग, माझगांव, मुंबई-१०. वि. कार्यालय : श्री गणेश मंगल केंद्र, सिडको नर्सरीजवळ, एन-१२, संभाजी नगर (औ.बाद)-४३१००३.

आवक क्र./वि.प.ने./स्व.वि.क./ ११६ दिनांक : १९ : ०८ : २०१३

प्रति,
मा. विनोद तावडे साहेब
विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद, महाराष्ट्र

27 अगस्त AUG 2013

महोदय,

आपणास माहितच असेल कि, संपुर्ण महाराष्ट्रातील शाळांमध्ये शाळा सुरू झाल्याबरोबर ज्ञानार्जनाच्या नियमित कार्यक्रमापुर्वी विद्यार्थी "जन–गन–मन" हे देशभक्तीपर राष्ट्रगीत समुहगानाच्या माध्यमातुन दररोज गात आहेत, यामागील उददेशच मुळात हा आहे कि मुलांमध्ये देश प्रेम, देशा बद्दलची एकनिष्ठा, देशभक्ती रूजावी व जागृत रहावी यासाठी राज्य शासनाच्या अनुदानीत शाळांसह सर्व खाजगी प्राथमिक व माध्यमिक (१०.वी पर्यंतच्या) शाळांमध्ये "जन–गन–मन" हे देशभक्तीपर राष्ट्रगीत गायले जात आहे. परंतु इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचे विद्यार्थीच हे देशभक्तीपर राष्ट्रगीत गातांना दिसत आहे हे विशेष.

त्या पुढे ११ वी व १२ वी सह उच्च शिक्षण घेतांना राज्य शासन, शिक्षण विभाग, प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षण संस्था चालकांना या देशभक्ती पर गीताचा कुठेतरी विसर पडलेला दिसतो आहे. विद्यार्थ्यांना जरी देशभक्तीपर राष्ट्रगीत गाण्याची इच्छा असली तरी कोणत्याही ११ वी व १२ वी सह उच्च शिक्षण घेणाऱ्या शिक्षण संस्थेमध्ये ही सुविधा नाही. पाश्चात्य संगीताचे बरेचसे कार्यक्रम ११ वी व १२ वी सह उच्च शिक्षण घेणाऱ्या शिक्षण संस्थेमध्ये राजरोस पणे शिक्षण संस्थाव्दारे आयोजित केले जातात, पण २४ तासात फक्त ५२ सेकंद देशभक्ती साठी देऊ शकत नाहीत ही ह्या राज्यातील राज्य शासन, शिक्षण विभाग, प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षण संस्था चालक यांची शोकांतिका आहे.

तरी विद्यार्थ्यांमध्ये ११ वी व १२ वी सह उच्च शिक्षण घेत असताना देशभक्ती व देशप्रेम रूजविण्यासाठी राज्यातील ११ वी व १२ वी सह सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रगीत सक्तीने सुरु करण्याबाबतचे निवेदन बुलंद छावा मराठा युवा परिषद महाराष्ट्र प्रणित विद्यार्थी आघाडी तर्फे राज्याचे मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.उच्च तंत्र शिक्षण मंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री, मा.उच्च तंत्र शिक्षण राज्यमंत्री, मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री, मा.मुख्य सचिव, मा.उच्च तंत्र शिक्षण सचिव, मा.शिक्षण सचिव, या सर्व महोदयांना सादर करण्यात आले आहे. व त्याची एक छायांकित प्रत सदर निवेदनासोबत जोडलेली आहे याची आपण नोंद घ्यावी.

आम्ही अशी सदिच्छा बाळगतो की, जो पर्यंत देशभक्तीचे बाळकडू पाजणारे राष्ट्रगीत ११ वी व १२ वी सह सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात गायले जात नाही तो पर्यंत आपण सर्व देशभक्त एकत्रित येऊन ११ वी व १२ वी सह सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रगीत सक्तीने सुरु करण्याबाबतचा पाठपुरावा करूया अशी आम्ही आपणासह राज्यातील सर्व लोकप्रतिनिधींना विनंती करत आहोत.

पान २ वर

देशाची परिस्थिती पाहता असे लक्षात की एकंदरीत देशातील उच्च शिक्षित नागरिक देखील या देशभक्तीपर गीताला विसरत चालले आहेत. त्यामुळे आपल्या देशातील जातीय सलोखा , बंधुभाव , राष्ट्रीय एकात्मता ही हळुहळु कमी होत आहे. त्यामुळे देशबांधवांमध्ये जातीय सलोखा , बंधुभाव , राष्ट्रीय एकात्मता वाढावी यासाठी विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाचे ठिकाण असणाऱ्या ११ वी व १२ वी सह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयामध्ये ज्ञानार्जनाचे काम सुरू होण्यापुर्वी राष्ट्रगीत हे गायलेच गेले पाहिजे.

आणि जो पर्यंत या कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयामध्ये सक्तीचे सामुहिक राष्ट्रगीत सुरु होत नाही तो पर्यंत आपले सहकार्य आम्हास लाभावे तसेच आपण ही महाराष्ट्र शासनाकडे वारंवार पाठपुरावा करावा, अशी सदिच्छा बाळगतो.

आपले स्नेहांकित

| | | |
|---|---|---|
| संदिप बाळासाहेब पटाडे | रोशन पुंडलिक ठोंबरे | रोहन विजय येरुणकर |
| अध्यक्ष मुंबई प्रदेश | अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश | संघटक महाराष्ट्र प्रदेश |

दिनांक: १३ : ०८ : २०१३

प्रति,
१)मा.मुख्यमंत्री ,
महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई ३२
२)मा.उपमुख्यमंत्री ,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय ,मुंबई ३२
३)मा.उच्च तंत्र शिक्षण मंत्री ,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय ,मुंबई ३२
४)मा.शालेय शिक्षण मंत्री ,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय ,मुंबई ३२
५)मा. मा.उच्च तंत्र शिक्षण राज्यमंत्री
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय ,मुंबई ३२
६) मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री ,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय ,मुंबई ३२
७)मा.मुख्य सचिव ,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई ३२.
८)मा: शिक्षण सचिव , उच्च तंत्र ,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय ,मुंबई ३२
९)मा.शिक्षण सचिव,शालेय शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई ३२.

*विषय : राज्यातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांत राष्ट्रगीत सक्तीने सुरु करणे बाबत...*

## "देश भक्तीला द्या फक्त दिवसाला ५२ सेकंद"

महोदय,

आठवा पारतंत्र्याचा काळ , आठवा देशभक्तांचे बलिदान, पुन्हा एकदा नसानसात घुमु द्या राष्ट्रभक्तीचा जोश,
द्या फक्त दिवसात ५२ सेकंद देशाला , राष्ट्रगीतांतुन घडवा राष्ट्रभक्ताला

आपणाला आठवत असेलच कि, रविन्द्रनाथ टागोर यांनी २६ डिसेंबर १९१८ रोजी "जन-गण-मन".... हे राष्ट्रगीत लिहिले व तब्बल ३२ वर्षा नंतर घटना समितीने दिनांक २४ जानेवारी १९५०रोजी रविन्द्रनाथ टागोर यांच्या या गीताला राष्ट्रगीत म्हणुन मान्यता दिली , ३२ वर्षाच्या प्रदिर्घ तपस्येनंतर रविन्द्रनाथ टागोर यांच्या या गीताला राष्ट्रगीताचा दर्जा मिळाला, देश हा एकसंघ राहावा अशी प्रेरणा या राष्ट्रगीतातुन मिळत असते, राष्ट्रगीत शाळा व चित्रपटगृह सोडल्यास दररोज इतर कोणत्याही ठिकाणी गायले जात नाही, हे देशातील जनतेचे दुर्दैव नाही का ? प्राथमिक व माध्यमिक शाळांत देण्यात येणाऱ्या ज्ञानार्जना पुर्वी राष्ट्रगीत होऊ शकते , मनोरंजनाचे ठिकाण असलेल्या चित्रपटगृहात सुध्दा राष्ट्रगीत होऊ शकते तर ज्ञानार्जनाचे उच्चस्थरीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयात राष्ट्रगीत का होऊ नये ? असा प्रश्न आम्हाला पडला आहे .

पान २ वर

युवक व विद्यार्थी हे जर देशाचे भवितव्य घडवणारे असतील तर १० वी नंतर त्यांना देशभक्ती चे बाळकडु पाजणारे राष्ट्रगीत महाविद्यालयांमध्ये का गायले जात नाही ? युवक खऱ्या अर्थाने याच वेळी समजण्याच्या अवस्थेत येत असतो . देश , देशभक्ती, राष्ट्रभक्ती काय आहे ? ही कळण्याची , खरा राष्ट्रभक्त घडण्याची किंवा घडविण्याची हीच योग्य वेळ असतानाच , अचानक देशभक्तीपर असणारे राष्ट्रगीत गायचे बंद होते हे योग्य नाही , खरे तर रोज आपले दैनदिन कामकाज सुरु करण्यापुर्वी प्रत्येकाने राष्ट्रगीत गायलेच पाहीजे असे आमचे व आमच्या संघटनेचे मत आहे. देशाच्या प्रत्येक नागरिकांमध्ये राष्ट्रभक्तीची ओढ निर्माण झाली पाहीजे असे आम्हाला वाटते , त्यामुळे आम्ही आमच्या संघटनेच्या वतीने निवेदन करीत आहोत कि ,

ज्या ज्या ठिकाणी शिक्षण घेण्याचे ज्ञानार्जनाचे कार्य घडत असेल त्या त्या ठिकाणी दररोज ज्ञानार्जनाचे कार्य सुरु होण्यापुर्वी "संपुर्णिक राष्ट्रगीत" गायलेच पाहीजे व जो पर्यंत आमची ही मागणी पुर्ण होणार नाही तो पर्यंत आम्ही आमचा हा लढा चालुच ठेऊ याची कृपया नोंद घ्यावी .

होय मी आहेच या भारत मातेचा पुत्र , मला अभिमान आहे माझ्या देशाच्या राष्ट्रगीताचा !
होय आहोत आम्ही भविष्य या देशाचे , त्याचा सार्थ अभिमान आहे आम्हाला !!

[illegible] !! जय महाराष्ट्र !! [illegible]

आपले

रोशन पुंडलीक टोंबरे
: अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश :
बुलंद छावा विद्यार्थी आघाडी ; महाराष्ट्र .
(९०२१४१७६७८)

मोहन विजय उंबरकर
: संघटक महाराष्ट्र प्रदेश :
बुलंद छावा विद्यार्थी आघाडी ; महाराष्ट्र.
(९०२९९९०८९६)

२१.८- (विद्यार्थी)